सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, नाशिक

नविन प्रशासकिय इमारत, महात्मा नगर, ए.बी.बी. सर्कल, त्र्यंबक रोड, नाशिक

दूरध्वनी क्र. 0253-2591010, e-mail : dyceogad.nashik@maharastra.gov.in

जिल्हा परिषद, नाशिक

"अनुकंपा अंतिम जेष्ठता यादी"

क्र.जिपना/ साप्रवि/आस्था 6/ /26,
दि. सप्टेबर 2026

प्रति,

1. **खाते प्रमुख, (सर्व),**
   जिल्हा परिषद, नाशिक.
2. **गट विकास अधिकारी (उ.श्रे.),**
   पंचायत समिती ------ (सर्व)

विषय :- अनुकंपा तत्वाने नियुक्ती मिळण्यासाठी पात्र उमेदवारांची दि. 01 सप्टेंबर 2026 रोजीची अंतिम प्रतिक्षासूची प्रसिद्ध करणेबाबत...

संदर्भ :-
1. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा - 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ, दि. 17.07.2025.
2. शासन निर्णय, ग्राम विकास विभाग, क्र.अकंपा - 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ., दि. 31.07.2025.
3. शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.अकंपा - 1225/ प्र.क्र.121/ म.लो.आ, दि. 22.08.2025.
4. कार्यासन अधिकारी, ग्राम विकास विभाग, यांचे पत्र क्र. अंकपा-2025/प्र.क्र.442/ आस्था-7, दि. 11.09.2025.
5. या कार्यालयाकडील पत्र क्र. जिपना/साप्रवि/आस्था-6/262/26, दि. 04.09.2026

उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय दि. 17.07.2025 व दि. 31.07.2025 नुसार परिपूर्ण असलेल्या अनुकंपा प्रस्तावाची 'गट - क' व 'गट- ड' ची प्रतिक्षा सूची दरवर्षी सप्टेबर व मार्च मध्ये प्रसिध्द करणे बाबत निर्देश दिलेले आहेत.

02. संदर्भ क्र. 05 चे पत्रानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रारूप प्रतिक्षा सूची प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. तसेच सदर यादीतील उमेदवार यांचे जेष्ठता क्रमांकाबाबत तसेच प्रतिक्षासूचीतील त्यांचे नावासमोरील तपशिलाबाबत व उमेदवाराच्या सर्व मुळ कागदपत्रांनुसार दि. 21.09.2026 रोजी पडताळणी केली आहे. सदर कागदपत्र पडताळणी मध्ये पात्र उमेदवारांची वाढीव शैक्षणिक आर्हतेची नोंद घेतली. तसेच सदर दिनांकास उमेदवारांकडून गट बदलाचे विकल्प भरून घेतले आहेत. त्यामध्ये गट- ड करीता एकुण-6 उमेदवारांनी विकल्प दिलेला आहे. त्यामुळे 'गट- ड' ची प्रतिक्षा सूचीत 06 उमेदवार आहेत.

03. यास्तव, या समवेत दि. 01 सप्टेंबर 2026 ची 'गट- क' व 'गट- ड' करीताच्या अनुकंपा उमेदवारांची अंतिम प्रतिक्षासूची प्रसिध्द करण्यात येत असून प्रतिक्षा सुची आपल्या कार्यालयाच्या ई-मेल आयडीवर तसेच जिल्हा परिषदेच्या www.zpnashik.maharashtra.gov.in_या संकेतस्थळावर मुख्य पृष्ठावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर प्रतिक्षा सुची अनुकंपा उमेदवारांचे निदर्शनास तातडीने आणून देण्यात यावी.

सोबत:- यादी पृ. क्र 1 ते

ओमकार पवार (भा.प्र.से.)
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, नाशिक

प्रत:
1. मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना माहितीसाठी सविनय सादर.
2. मा. जिल्हाधिकारी, नाशिक यांना माहीतीस्तव सादर.
3. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांचे वैयक्तीक कार्यालय यांना अग्रेषित.
4. जिल्हा प्रकल्प प्रमुख, (आय टी सेल) नाशिक.

2/- सदर पत्र व अनुकंपा अंतिम प्रतिक्षासूची जि.प.नाशिकच्या www.zpnashik.maharashtra.gov.in या वेबसाईटवर प्रसिद्ध करण्याबाबतची कार्यवाही करणेत यावी.